


दि. १२/०७/२०२१

**(नियम ३ पहा)**

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वय माहिती मिळवण्या बाबत अर्ज

**प्रती:** श्री. वासुदेव शिरवलकर ( नगर सचिव )
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
~~स.प्र.न.क्र.~~/~~ज.क्र.~~ मा.अ.
आवक क्र. ३४/२०२१/२२
दिनांक:- १२/ ७ /२०२१

**तक्रारदार :** श्री. शकील कोतवाल
बी/७०१ अस्मिता अस्कन -३
नयानगर मिरा रोड ( पू) जि. ता.
ठाणे, ४००११०७
**मोबाइल नंबर: ९९३०६३६३०२**

**विषय:** मा. विशेस स्थायी समिती सभा दि.२७/०७/२०१५ .

**महोदय,**

मा. विशेस स्थायी समिती सभा दि.२७/०७/२०१५ . प्रकरण क्र.५० ठराव क्र,४९ चा गोषवारे, विषयपत्रिका व ठराव ची सविस्तर माहिती व अवलोकन मिळणे बाबत विनंती .
माहिती स्वतः घेऊन जाणार.

S. Kotwal

अर्जदार स्वाक्षरी

९८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग
ईमेल- www.nagarsachiv.mbmc.gmail.com

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ३४ /2021 दिनांक :- २३ / ७/2021

प्रति,
श्री. शकील कोतवाल,
बी/701, अस्मिती अस्कन,
नयानगर, मिरारोड (पूर्व),
ठाणे, पिन 401 107

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
मा. विशेष स्थायी समिती सभा दि. 27/07/2015.

संदर्भ :- आपणांकडील दि. 12/07/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मा. विशेष स्थायी समिती सभा दि. 27/07/2015, प्रकरण क्र. 50, ठराव क्र. 49 चा गोषवारे, विषयपत्रिका व ठरावाची सविस्तर माहिती व अवलोकन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्या अनुषंगाने, आपणांस मा. विशेष स्थायी समिती सभा दि. 27/07/2015 रोजीची सभा सुचना, विषयपत्रिका, प्रकरण क्र. 50 चा गोषवारा व सदर प्रकरणावर पारित ठराव क्र. 49 ची सत्यप्रत उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 04)

यासाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 04 पानांकरिता रुपये 08/- (अक्षरी रुपये सव्वीस मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
(भ्रमणध्वनी क्र. 9967481732)

23/7/2021

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०७/२०१५.

## मा. विशेष स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०७ दिनांक २४/०७/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा सोमवार दि. २७/०७/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. २४/०७/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०७, दि. २४/०७/२०१५ सोबतची विषय पत्रिका

## सभा सोमवार दि. २७/०७/२०१५

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ४९ | मनपा क्षेत्रातील पावसाळी पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजूरी मिळणेबाबत. |
| ५० | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४८१ (१) (ह) अन्वये तोडजोड करण्याकरीता मंजूरी मिळणेबाबत. |
| ५१ | सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल स्थायी समितीस सादर करणेबाबत. |

दिनांक :- २४/०७/२०१५.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जन. मा. अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २८/७/२०१५

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ५० ) :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४८१ (१) (ह) अन्वये तडजोड करण्याकरीता मंजुरी मिळणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि.३१/०१/२०११ व दि.२२/०२/२०११ रोजी मौजे खारीबंदर सर्व्हे क्र. ८१/१, २,३ पै. २७/१,२,१०अ, २८/५, २९/३, ७२/२, ७३/१ ते ४ ७४/१,२, ७५/१, ७६/१ ते ४, ८८/१,३, २२५/१ पै. ८६/२ ते ८६, ८७/१,२ व मौजे नवघर सर्व्हे क्र. ४३५, ४३६/२, ४३७/१ ते ११, ४३८/१ ते ६ ,८,१०, ४४०/१,३ ते १३, ४४४/१,३,५, ४४३/१,२ पै. ४१७/७, ४१८/२,३,४ ४३०,४३१,४३२, ४३३ मौजे मिरा १५८/२, १५९/२, १५४/२,४, १५६/२ या जागेत डी.पी. रस्ता व त्यालगत असलेल्या नाल्याचे बांधकाम करण्यास अटीशर्तीनुसार मे. रवि डेव्हलपर्स यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर परवानगीनुसार मे. रवि डेव्हलपर्स यांनी रस्त्याचे व नाल्याचे बांधकाम केलेले असून इतर काम करीत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम मधील तरतूदीनुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाने पारीत केलेल्या निर्णयानुसार त्यांना अतिरिक्त एफ.एस.आय/ टी.डी.आर देण्याची मागणी करुन देखीलही महानगरपालिकेने सदरचा मोबदला (टी.डी.आर/ एफ.एस.आय च्या स्वरुपात) न दिल्यामुळे महानगरपालिकेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ५५०९/२०१३ दाखल करुन महानगरपालिकेस सदरचा वाढीव एफ.एस.आय/ टी.डी.आर देण्यासाठी आदेशित करण्याची मागणी केलेली आहे.

विषयांकित डी.पी. मधील रस्त्याचे आय.आय.टी. मुंबई यांच्याकडून पुर्नपाहाणी करुन घेतल्यानंतर त्यांच्या अहवालाप्रमाणे सदरचे रस्ते सुस्थितीत असल्याचे अहवाल सादर केलेला आहे. सदरची याचिका मा. उच्च न्यायालयात दि.१५/०४/२०१५ रोजी सुनावणीकरीता आली असता विकासक यांना टी.डी.आर. देतेवेळेस आय.आय.टी. चा अहवाल ग्राह्य धरु, असे महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयात म्हणणे सादर करण्यात आलेले असता मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सदर याचिकेतील याचिकेदार यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेला टी.डी.आर. मिळणेबाबतच्या प्रस्तावावर महानगरपालिकेने ४ आठवड्यात निर्णय घेण्यास आदेशित केलेले आहे. सदर आदेशानुसार याचिकेदार यांच्या टी.डी.आर. मिळण्याबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी याचिकेदार यांना सुनावणीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली व/ किंवा डी.एस.आर. च्या दराप्रमाणे त्यांना टी.डी.आर./ एफ.एस.आय. दिल्यास त्यांनी महानगरपालिकेसाबत समझोता पत्र (Consent Term) दाखल करण्याचे निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी विषयांकित याचिकेमध्ये महानगरपालिकेच्या वतीने याचिकेदार यांच्यासोबत वरीलप्रमाणे तडजोड करणेस आणि समझोता पत्र दाखल करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४८१ (१) (ह) अन्वये मान्यता देणेस शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2015-16/MT-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि.२७/०७/२०१५

**प्रकरण क्रमांक ( ५० )** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४८१ (१) (ह) अन्वये तडजोड करण्याकरीता मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र.** ( ४९ ) :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार विषयांकित याचिकेमध्ये महानगरपालिकेच्या वतीने याचिकेदार यांच्यासोबत वरीलप्रमाणे तडजोड करणेस आणि समझोता पत्र दाखल करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४८१ (१) (ह) अन्वये देण्यात येत आहे.

**सुचक:-** श्री. हरिश्चंद्र आमगांवकर

Ashwin S. Kasodariya
**अनुमोदन :-** श्री. अश्विन कासोदरिया

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2015-16/ST-2